भिवंडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७६२ /२०२६ दि. ०९ /०९/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी. भिवंडी शहरात दि. ०५/०९/२०२६ रोजी **'गोपाळकाला'** सणा निमित्ताने दहीहंडी उत्सव साजरा होणार आहे. भिवंडी शहरात या मुख्य रस्त्यावर कॉटरगेट जकात नाका स्व. आनंद दिघे चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी मुख्य दहिहंडी बांधली जाणार आहे. या दहिहंडी करीता मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य व मा. उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तसेच मा.केंद्रिय राज्यमंत्री भारत सरकार असे उपस्थित राहण्याची शक्यता आहे त्यांचे जाणे – येण्याच्या मार्गात अंशत: बदल करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

प्रवेश बंद – १) बागे फिरदोस येथुन मौलाना आझाद उड्डाणपुलावरून (वंजारपट्टी ब्रीज) छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या दिशेने उतरणाऱ्या ब्रीजवरील सर्व प्रकारच्या वाहनांना **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची सर्व प्रकारची वाहने ही मौलाना आझाद उड्डाणपुलाखालुन (वंजारपट्टी ब्रीज) वंजारपट्टीनाका येथुन डावे वळण घेवुन इच्छित स्थळी जातील.

महत्वाचे व्यक्ती करीता पर्यायी मार्ग **छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडून अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या परतीच्या प्रवासावेळी पांजरापोळ चौकातुन दुभाजकाच्या उजव्या बाजुने मौलाना आझाद उड्डाणपुलावरून (वंजारपट्टी ब्रीज) छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या दिशेने उतरणाऱ्या ब्रीजवरून विरूध्द दिशेने जावुन उजवे वळण घेवुन बागे फिरदोस येथुन स्व. राजीव गांधी उड्डाणपुलावर जातील.**

सदर अधिसूचना **दि.०५/०९/२०२६ रोजी सकाळी ०९:०० वा. ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो** अंमलात राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर :–
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. आयुक्त, भिवंडी–निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, कल्याण व नवी मुंबई

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग, ठाणे/भिवंडी/कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२ भिवंडी व विशेष शाखा, ठाणे
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामिण

प्रत :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा. भिवंडी–निजामपूर शहराच्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

दहिहंडी रणांगणिमित्त.

